मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मोशीत भक्तिचा मळा फुलला

## श्री नागेश्वर महाराजांचा मानाचा विडा 25 लाखांना, तर लिंबू 10 लाखांच्या पार!





**पिंपरी | प्रतिनीधी**

येथील ग्रामदैवत श्री नागेश्वर महाराज यात्रा आणि भंडारा उत्सवानिमित्त आयोजित पारंपारिक लिलावात यंदा श्रद्धेचा मोठा पूर पाहायला मिळाला. शिवरात्रीपासून सुरू झालेल्या या उत्सवात शुक्रवारी पार पडलेल्या लिलाव प्रक्रियेत भाविकांनी सढळ हाताने बोली लावली. या लिलावात सर्वांचे लक्ष वेधून घेणारा 'मानाचा वैभवी विडा' तब्बल २५ लाख रुपयांना गेला. भाविक विजय पांडुरंग सस्ते यांनी ही विक्रमी बोली लावून विड्याचा मान मिळवला आणि महाराजांच्या चरणी नतमस्तक होत आशीर्वाद घेतला. यावेळी मंदिर सभागृहात भाविकांनी टाळ्यांच्या गजरात आणि जयघोषात परिसर दणाणून सोडला होता.

यात्रेच्या निमित्ताने आयोजित या लिलावात केवळ विडाच नाही, तर इतर वस्तूंनाही लाखो रुपयांची बोली लागली. मानाची ओटी मिळवण्यासाठी भाविकांमध्ये मोठी चुरस पाहायला मिळाली, जी अखेर आकाश विष्णू सस्ते यांनी १५ लाख ११ हजार १०१ रुपयांना घेतली. लिलावातील शेवटच्या लिंबू फळासाठी स्वप्निल दत्तात्रेय सासवडे यांनी १० लाख ११ हजार १०५ रुपयांची बोली लावून सर्वांना थक्क केले, तर मानाचे पहिले लिंबू संभाजी बबन बोऱ्हाडे यांनी २ लाख ११ हजार रुपयांना घेतले. याशिवाय मानाचा पहिला विडा योगेश गुलाब बोराटे यांनी २ लाख ५१ हजार रुपयांना आपल्या नावे केला. केदारी कुटुंबाने परंपरेनुसार या लिलावाचे कामकाज पाहिले.

सकाळी दहा वाजल्यापासून सुरू झालेल्या या लिलावात श्री नागेश्वर महाराजांच्या चरणी अर्पण केलेल्या वस्तू, सोन्या-चांदीचे दागिने आणि भंडाऱ्यातील प्रसादाचा समावेश होता. या संपूर्ण प्रक्रियेतून यंदा दीड कोटी रुपयांहून अधिक निधी जमा झाला असून, देवाच्या दारात पैशापेक्षा श्रद्धेला मोठे मोल असते याचा प्रत्यय मोशीकरांनी पुन्हा एकदा आणून दिला.

दरवर्षी भंडाऱ्यासाठी लागणारी भांडी ग्रामस्थांकडून नव्याने खरेदी केली जातात, ही परंपरा यंदाही जपण्यात आली. मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या ग्रामस्थ आणि भाविकांच्या उपस्थितीत हा सोहळा अत्यंत भक्तिमय आणि जल्लोषात पार पडला.

---

# महापालिकेतील गैरव्यवहार आणि भ्रष्टाचार रोखण्यासाठी श्रीकर परदेशी किंवा तुकाराम मुंढे यांची आयुक्तपदी नियुक्ती करा; मारुती भापकर





**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील कथित गैरव्यवहार आणि भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून शहरात पुन्हा एकदा राजकीय वातावरण तापले आहे. सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना निवेदन दिले आहे. महापालिकेतील भ्रष्टाचार आणि गैरव्यवहार रोखण्यासाठी श्रीकर परदेशी किंवा तुकाराम मुंढे यांना आयुक्तपदी नियुक्त करा अशी मागणी भापकर यांनी केली आहे.

मारुती भापकर यांनी निवेदनात म्हटले आहे की, २०१७ ते २०२२ या कालावधीत तसेच २०२२ ते २०२६ या प्रशासकीय राजवटीत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार आणि गैरव्यवहार झाल्याचा आरोप केला आहे. विशेषतः विविध कंत्राटे, विकास प्रकल्प, स्मार्ट सिटी उपक्रम, टीडीआर व्यवहार, सिमेंट रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, आरोग्य विभाग, सुरक्षा व स्वच्छता कंत्राटे यामध्ये अनियमितता झाल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

दरम्यान, नुकत्याच घडलेल्या एका घटनेचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, एका महिला उपायुक्तांच्या केबिनमध्ये घुसून कंत्राटाच्या अटी बदलण्यासाठी दबाव टाकण्यात आल्याची तक्रार संबंधित अधिकाऱ्यांनी संत तुकारामनगर पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. या प्रकरणामुळे महापालिका प्रशासनात खळबळ उडाली आहे.

भापकर यांनी निवेदनात नमूद केले की, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या २०२६ च्या निवडणुकीत पुन्हा बहुमत मिळाल्यानंतर सत्ताधाऱ्यांकडून सत्तेचा गैरवापर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शहराच्या सुनियोजित आणि दर्जेदार विकासासाठी कठोर व पारदर्शक प्रतिमेचे अधिकारी आयुक्त म्हणून नेमावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. यासाठी त्यांनी डॉ. श्रीकर परदेशी किंवा तुकाराम मुंढे यांची पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आयुक्तपदी नियुक्ती करावी, अशी मागणी केली आहे.

# निळ्या अन् लाल पूररेषांचे होणार पुन:सर्वेक्षण!

## आमदार शंकर जगताप यांच्या पाठपुराव्याला अखेर यश; 12 सदस्यांची समिती करणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

निळ्या आणि लाल पूररेषेसंदर्भात केलेल्या पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवडसह राज्यातील प्रमुख शहरांमध्ये नद्यांलगतच्या निळ्या व लाल पुररेषेचे नव्याने पुनर्वेक्षण करण्यासाठी शासनाकडून नियमावली तयार करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात येणार आहे. यासाठी सरकारने पिंपरी चिंचवडसह १२ सदस्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे अशी माहिती आमदार शंकर जगताप यांनी दिली. दरम्यान गठीत केलेली समिती पुढील दोन महिन्यात शासनाला अहवाल सादर आहे.

पिंपरी चिंचवडसह राज्यात प्रमुख शहरांमध्ये नद्यालगतच्या निळ्या आणि लाल पूररेषेसंदर्भातले प्रश्न प्रलंबित आहेत. यामुळे नागरिकांना अडचणी निर्माण होत होत्या. पिंपरी चिंचवड मधील पवना, इंद्रायणी आणि मुळा नद्यांच्या निळ्या पूररेषेत झालेली अधिकृत तसेच अनधिकृत बांधकामे हा मुख्य प्रश्न आहे. यासाठी आमदार शंकर जगताप यांच्या माध्यमातून वेळोवेळी शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला. राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दि २५ मार्च २०२५ रोजी (लक्षवेधी सूचना क्रमांक १९४६ )मांडतांना उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे समिती नेमण्याची मागणी केली होती.

दरम्यान नुकत्याच झालेल्या पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकांच्या प्रचारार्थ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आले होते. १० जानेवारी २०२६ रोजी आकुर्डी येथे झालेल्या सभेमध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यातील निळ्या आणि लाल पूररेषेसंदर्भात नव्याने सर्वेक्षण केले जाईल असे सांगितले होते. याबाबतीत आमदार शंकर जगताप यांनी पाठपुरावा सुरूच ठेवला होता. या पाठपुरावाला मोठे यश मिळाले आहे.



आमदार शंकर जगताप म्हणाले शासनाकडून राज्यातील नद्यांलगतच्या निळ्या व लाल पूररेषांचे नव्याने पुन:सर्वेक्षण करण्यात येणार आहे. नगर विकास विभागाचे उपसचिव प्रणव करपे यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत. निळ्या आणि लाल पूर रेषेचा प्रश्न युनिफाईड डीसीपीआर मुळे निर्माण झाला आहे. यामुळे नदीलगतच्या अनेक भागांमध्ये नवीन डेव्हलपमेंट थांबलेली आहे. निळी आणि लाल पुरेषा ही शंभर वर्षांपूर्वीच्या गृहीतकांवर आधारित आहे. त्यामुळे यामध्ये बदल होणे, नव्याने सर्वेक्षण होणे आवश्यक होते. यासाठी वेळोवेळी मागणी केली. या मागणीनुसारच समिती गठीत केली जाणार आहे. या समितीमध्ये नगरविकास, जलसंपदा, पर्यावरण आणि मदत व पुनर्वसन विभागाचे अपर सचिव, प्रधान सचिव किंवा सचिव यांचा सहभाग आहे. तसेच नाशिक येथील 'मेरी' संस्थेचे महासंचालक संजीव टाटू, पुण्यातील नगररचना विभागाचे संचालक आणि सहसंचालक, पिंपरी चिंचवड कोल्हापूर आणि चंद्रपूर या महापालिकांचे आयुक्त महाड आणि कुळगाव बदलापूर नगर परिषदांचे मुख्याधिकारी यांचा समावेश आहे.

### दोन महिन्यात अहवाल देणार

» ही समिती राज्यातील ज्या शहरांमध्ये निळ्या आणि लाल पूररेषेचा विषय अडचणीचा ठरत आहे अशा ठिकाणी नव्याने सर्वेक्षण करण्याचे व पुरामुळे बाधित होणारे क्षेत्र आणि जीवित व मालमत्तेचे होणारे नुकसान याबाबत सरकारला उपाय सुचवणार आहेत. पूर्वाधित क्षेत्रातील बांधकामांची संख्या, बांधकामांची जोते पातळी, नदीची वहन क्षमता, प्रवाहाची दिशा व तांत्रिक मुद्द्यांचा विचार करून सरकारला ही समिती अभिप्राय देणार आहे. समितीने परिस्थिती नुसार माहिती तज्ञ,संस्था यांच्यासमवेत वेळोवेळी बैठक घ्यायची आहे तसेच आवश्यक त्या शिफारशी तयार करून अहवाल दोन महिन्यांमध्ये सरकारला मान्यतेसाठी सादर करायचा आहे.

# सांगवीत 25 फेब्रुवारी ते 1 मार्चदरम्यान 'पवनाथडी जत्रा'

## महिला बचत गटांना मोठे व्यासपीठ; स्टॉलसाठी अर्जाची अंतिम तारीख 18 फेब्रुवारी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या समाज विकास विभागामार्फत दि. २५ फेब्रुवारी २०२६ ते १ मार्च २०२६ या कालावधीत सांगवी येथील पी.डब्ल्यू.डी. मैदानावर 'पवनाथडी जत्रा'चे आयोजन करण्यात आले आहे. महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना व्यापक बाजारपेठ उपलब्ध करून देणे, महिलांमध्ये विपणन व विक्री कौशल्यांचा विकास करणे तसेच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरा आणि शहरी संस्कृतीचे जतन करणे हा या जत्रेचा मुख्य उद्देश आहे.

महापालिकेच्या वतीने दरवर्षी आयोजित करण्यात येणारी पवनाथडी जत्रा ही महिला उद्योजिकांसाठी महत्त्वाचे व्यासपीठ ठरत असून विविध हस्तकला, खाद्यपदार्थ, गृहउद्योग




उत्पादने आणि पारंपरिक वस्तूंचे प्रदर्शन व विक्री यामध्ये केली जाते.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील जत्रेसाठी सहभाग अर्जाचे वाटप व स्वीकृती दि. १० फेब्रुवारी २०२६ पासून सुरू करण्यात आली आहे. सदर अर्ज समाज विकास विभागाकडे सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० या वेळेत उपलब्ध आहेत. या जत्रेकरिता जनरल, व्हेज आणि नॉन व्हेज या तीन प्रकारात स्टॉल वाटप करण्यात येणार आहेत. सहभागासाठी बचत गटाचे नोंदणी प्रमाणपत्र, संबंधित महिलेचे आधार कार्ड, बँक पासबुकची प्रत व फोटो ही कागदपत्रे आवश्यक आहेत.

दि.१० फेब्रुवारी ते १६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत सुमारे २,५०० अर्ज महिला बचत गट, मा. खासदार, मा. आमदार व मा. नगरसेवक यांच्याकडे वाटप करण्यात आले असून त्यापैकी १६८ अर्ज समाज विकास विभागाकडे प्राप्त झाले आहेत. अर्ज स्वीकृतीची अंतिम तारीख दि. १८ फेब्रुवारी २०२६ आहे.

### सहभागासाठी खालील कागदपत्रे आवश्यक..

- बचत गटाचे नोंदणी प्रमाणपत्र
- संबंधित महिलेचे आधार कार्ड
- बँक पासबुकची प्रत
- फोटो

“ पवना थडी जत्रेमध्ये महिला बचत गटांना मोठे आपल्या वस्तू व पदार्थ विक्रीसाठी मोठे व्यासपीठ मिळणार आहे. याद्वारे जास्तीत जास्त महिला बचत गटांना या जत्रेत आपल्या उत्पादनांसाठी मोठी बाजारपेठ मिळणार आहे.

- रवि लांडगे, महापौर,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

# थकबाकी भरा, अन्यथा पाणी देणार नाही!

## खडकवासला पाण्यावरून वाद तीव्र; पाणी बंद करण्याचा इशारा

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिका पिण्यासाठी खडकवासला धरणातून पाणी उचलते. मात्र त्याबदल्यात असलेली पाणीपट्टी वेळेवर भरत नाही. त्यामुळे महापालिकेकडे तब्बल ९३२ कोटी रुपयांची पाणीपट्टीची थकबाकी शिल्लक आहे. ही 'थकबाकी तातडीने भरा, अन्यथा लवकरच पाणी कपात करु' अशी नोटीस जलसंपदा विभागाने पुणे महापालिकेला पाठविली आहे.



पिंपरी चिंचवड महापालिकेलाही १२२ कोटी रुपयांची थकबाकी भरण्याचा इशारा देण्यात आला आहे. खडकवासला धरणातून पुणे महापालिकेला ११.६० अब्ज घनफूट (टीएमसी) इतका पाणीसाठा मंजूर आहे. मात्र ठरवून दिलेल्या पाण्यापेक्षा महापालिका अधिक पाणी धरणातून उचलत असल्याचे वारंवार समोर आले आहे. पुणे महापालिकेने २०२४- २५ मध्ये प्रत्यक्ष पाणी वापर २०.४४ टीएमसी इतका झाला आहे. महापालिकेला मंजूर करण्यात आलेल्या पाण्याच्या कोट्यापेक्षा महापालिकेने गेले वर्षभरात तब्बल ८.८४ टीएमसी इतका पाणीसाठा अतिरिक्त वापर केल्याचे समोर आले आहे.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे ठोक जलदराच्या २०२२ च्या आदेशातील तरतुदीनुसार, नियमबाह्य व मापदंडापेक्षा अतिरिक्त पाणी वापरावर दंडनीय आकारणी करण्यात आली आहे. यामध्ये १०० टक्के पाणीवापरासाठी निश्चित करण्यात आलेले दर आकारण्यात येतात. १०० ते १२५ टक्के पाणीवापरासाठी निश्चित दराच्या दीडपट तर १२५ टक्क्यांपेक्षा जास्त पाणीवापर झाल्यास तीन पट दर आकारण्याची तरतूद आहे.

त्यानुसार जलसंपदा विभाग महापालिकेला वाढीव पाणीवापराबद्दल पाणीपट्टी लावते. मात्र गेल्या अनेक वर्षापासून महापालिका पाणीपट्टी भरत नाही. त्यामुळे ही थकबाकी वाढून ९३२ कोटींवर पोहोचली आहे. गेल्या नोव्हेंबर, डिसेंबर अखेरीस १९ कोटी ७५ लाख रुपये इतकी रक्कम महापालिकेने थकबाकीपोटी भरल्याचे जलसंपदा विभागाने नोटिशीमध्ये म्हटले आहे.

महापालिकेने तातडीने ही थकबाकी भरावी, असे जलसंपदा विभागाने कळविले आहे. महापालिकेच्या जादा पाणी वापरामुळे जिल्ह्यातील सिंचनासाठी पाणी देणे जिकरीचे होत आहे. पुणे महानगरपालिकेचा २०२५-२६ साठीचा वार्षिक मंजूर पाणी कोटा पूर्ण होत आला आहे. हा पाणी पुरवठा संपुष्टात आला असून आता लवकरच पाणीपुरवठा तत्काळ खंडित करण्यात येईल, असाही इशाराही देण्यात आला आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात महापालिकेवर पाणी कपात करण्याची वेळ येण्याची शक्यता आहे.

खडकवासला पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता किरण देशमुख म्हणाले, पुणे महानगरपालिकेचा मंजूर पाणी कोट्याचा वापर पूर्ण झाला आहे. पालिकेकडे ९५२ कोटींपैकी १९ कोटी रुपयांची काही रक्कम गेल्या दोन महिन्यापूर्वी भरण्यात आली आहे. वरिष्ठ पातळीवरून पाणीपट्टी वसुलीच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार पुणे महापालिकेला नोटीस देण्यात आली आहे. रक्कम न भरल्यास पाणी दिले जाणार नाही.

# महापालिकेच्या विद्यार्थी अर्थसाहाय्य योजनेला उत्पन्नाची अट!

## पुढील वर्षापासून 8 लाख उत्पन्न मर्यादा लागू होण्याची शक्यता

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या वतीने शहरातील दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शैक्षणिक अर्थसाह्य (शिष्यवृत्ती) योजनेचा फायदा मिळविण्यासाठी उत्पन्नाची अट घातली जाणार आहे. पुढील वर्षापासून आठ लाख रुपयांच्या उत्पन्नाची मर्यादा या योजनेसाठी बंधनकारक केली जाणार आहे. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत हा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी आला आहे. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीनंतर त्यावर शिक्कामोर्तब होणार आहे.

महापालिकेत निवडणूक होऊन लोकप्रतिनिधी आल्याने महापालिकेचे सभागृह अस्तित्वात आले आहे. महापालिकेत प्रशासक राज असताना प्रशासक म्हणून काम करणाऱ्या महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी अर्थसाहाय्य योजनेला उत्पन्नाची अट घालण्याचा प्रस्ताव स्थायी समितीत मंजूर केला आहे. मात्र, आता नवीन सभागृह त्यावर निर्णय घेणार आहे. उद्या (बुधवारी) होणाऱ्या सर्वसाधारण सभेत हा विषय मान्यतेसाठी येणार आहे. त्यावर सत्ताधारी पक्ष असलेला भारतीय जनता पक्ष नक्की काय भूमिका घेणार, यावर या निर्णयाचे भवितव्य ठरणार आहे.

पुणे महापालिकेच्या वतीने शहरातील दहावी-बारावीच्या परीक्षेत गुणवंत ठरलेल्या विद्यार्थ्यांना दर वर्षी आर्थिक मदत दिली जाते. महापालिकेच्या समाज विकास विभागाकडून ही मदत दिली जाते. सध्या या योजनेस कोणतीही उत्पन्नाची मर्यादा नाही. गेल्या काही वर्षांपासून या योजनेच्या अंमलबजावणीमुळे महापालिकेच्या खर्चात मोठी वाढ झाल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. याला प्रतिबंध घालण्याबरोबरच या योजनेचा फायदा द्यायचा झाल्यास त्यासाठी उत्पन्नाची मर्यादा आठ लाख एवढी करण्याचा प्रस्ताव प्रशासनाने ठेवला आहे.




दहावीच्या परीक्षेत गुणवंत ठरलेल्या विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद शैक्षणिक अर्थसाहाय्य योजनेंतर्गत आणि बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे शैक्षणिक अर्थसाहाय्य योजनेत पुढील शिक्षणासाठी अर्थसाहाय्य देण्याची ही योजना आहे. यामध्ये दहावीसाठी १५ हजार, तर बारावीसाठी महापालिकेने निश्चित करून दिलेल्या अटीनुसार गुण मिळाल्यास २५ हजारांची शिष्यवृत्ती दिली जाते. महापालिकेने २००८-०९ मध्ये ही योजना सुरू केली होती. त्या वेळी योजनेवरील खर्च हा ४ कोटी ७९ लाख इतका होता. २०१७-१८ मध्ये हा खर्च २१ कोटी रुपयांपर्यंत गेला आहे.

या योजनेवरील खर्च गेल्या काही वर्षांपासून वाढत चालला आहे. त्यामुळे या योजनेचा फायदा द्यायचा असेल, तर काही निकष लावणे आवश्यक आहे. त्यानुसार ज्या कुटुंबाचे सर्व उत्पन्न आठ लाखांच्या आत आहे, त्यांच्यासाठी नियम-अटीत बदल करण्यासाठी प्रशासनाने २०१५ च्या मुख्य सभेच्या ठरावाचा आधार घेतला. ही योजना पाच वर्षे प्रायोगिक तत्त्वावर राबवली जावी आणि त्यानंतर आढावा घेऊन त्यात सुधारणा करावी असे ठरावात म्हटले होते.

याचा प्रस्ताव प्रशासक म्हणून जबाबदारी सांभाळताना महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी स्थायी समितीच्या बैठकीत मंजूर करून घेतला आहे. हा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात आला आहे. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीनंतर त्याची अंमलबजावणी होणार आहे.

### हे आहेत योजनेचे निकष....

- इयत्ता दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी (खुल्या प्रवर्गासाठी) : ८० टक्के गुण
- दहावी (मागासवर्गीय प्रवर्ग) : ७० टक्के गुण
- इयत्ता बारावी उत्तीर्ण (खुला प्रवर्ग) : ८० टक्के गुण
- इयत्ता बारावी : (मागासवर्गीय प्रवर्ग) : ७० टक्के गुण
- महापालिका शाळा, रात्रशाळा प्रवर्ग : किमान ७० टक्के गुण आवश्यक
- दिव्यांग विद्यार्थी (४०टक्क्यांपेक्षा अधिक अपंगत्व) : किमान ५५ टक्के गुण आवश्यक.
- कचरावेचक, बायोगॅस प्रकल्पातील पालकांची मुले: किमान ६५ टक्के गुण आवश्यक.
- अंध विद्यार्थी : इयत्ता दहावी, बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक.
- प्रवेश निकष: दहावी, बारावी नंतर शासनमान्य, विद्यापीठ मान्य संस्था किंवा अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेला असावा.
- अर्जदार पुणे महापालिकेच्या हद्दीत राहणारा असावा.


# पुण्यात 'फॅक्टरी ऑफ द फ्युचर'!

## आघाडीच्या तंत्रज्ञान कंपनीची 653 कोटींची गुंतवणूक

**पुणे | प्रतिनिधी**

देशात माहिती तंत्रज्ञान (आयटी) आणि उत्पादन क्षेत्रात अग्रेसर असलेल्या पुण्यात आता अत्याधुनिक 'फॅक्टरी ऑफ द फ्युचर'ची उभारणी केली जाणार आहे. यासाठी एसकेएफ इंडिया ही आघाडीची कंपनी ६५३ कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. ही नवीन उत्पादन सुविधा २०३० पर्यंत कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे. या निमित्ताने पुण्यातील निर्मिती क्षेत्राने अत्याधुनिक पाऊल टाकले आहे.

उद्योगांसाठी तंत्रज्ञान व उपाययोजना पुरवणारी कंपनी एसकेएफ इंडियाने पुण्यात अत्याधुनिक 'फॅक्टरी ऑफ द फ्युचर' उभारण्यासाठी ६५३ कोटी रुपयांची गुंतवणूक जाहीर केली आहे. नवीन उत्पादन सुविधा 'लीन', 'क्लीन' आणि पूर्णपणे



डिजिटल पायाभूत सुविधांनी सुसज्ज असा असेल. या प्रकल्पात बुद्धिमान प्रणाली, रिअल-टाइम डेटा विश्लेषण, ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञान आणि स्वयंचलित उत्पादन प्रक्रिया यांचा समावेश असेल. त्यामुळे उत्पादनाची गुणवत्ता, वेग, अचूकता आणि कार्यक्षमता यामध्ये लक्षणीय वाढ होणार आहे. ही उत्पादन सुविधा २०३० पर्यंत सुरू होणार असून, भारतातील कंपनीच्या प्रगत उत्पादन क्षमतेला नवे बळ मिळणार आहे.

कंपनीच्या दीर्घकालीन धोरणानुसार हा प्रकल्प केवळ उत्पादनवाढीपुरता मर्यादित नसून, अधिक सक्षम, लवचिक आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक उत्पादन साखळी निर्माण करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. याबाबत कंपनीचे मॅन्युफॅक्चरिंग ऑपरेशन्स संचालक सुजीत पै म्हणाले की, भारत सध्या उत्पादन क्षेत्रात महत्त्वाच्या टप्प्यावर उभा आहे आणि एसकेएफ इंडिया इंडस्ट्रियल या संधीचा लाभ घेत आघाडीवर राहील. 'फॅक्टरी ऑफ द फ्युचर' पूर्णपणे डिजिटल आणि शाश्वत तत्त्वांवर आधारित असेल. ऊर्जा बचत, स्थानिक उत्पादनवाढ आणि मजबूत पुरवठा साखळी (यावर विशेष भर देण्यात येणार आहे. त्यामुळे भारत जागतिक उत्पादन केंद्र म्हणून अधिक सक्षम होईल.

### पुण्यातील उत्पादन क्षेत्राला बळ

» पुण्यात कंपनीची आधीपासूनच भक्कम उपस्थिती आहे. नवीन प्रकल्पामुळे विद्यमान उत्पादन सुविधांचे एकत्रीकर करण्यात येणार असून, त्यात नवीन सुविधांची भर घालण्यात येणार आहे. यातून अधिक विस्तारक्षम उत्पादन संरचना उभारली जाणार आहे. ऊर्जा, रेल्वे, धातू व खाण तसेच इतर अवजड उद्योग क्षेत्रांना जलद सेवा देण्यासाठी ही सुविधा उपयुक्त ठरणार आहे. देशात वाढत्या पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या पार्श्वभूमीवर या क्षेत्रांना उच्च दर्जाचे, वेगवान आणि स्थानिक पातळीवर उपलब्ध उत्पादन महत्त्वाचे ठरणार आहे.

# समाविष्ट 23 गावांसाठी दोन हजार कोटींचे जागतिक बँक कर्ज

## वाघोली, लोहगावसह पूर्व-पश्चिम भागातील सात गावांसाठी स्वतंत्र सांडपाणी योजना

**पुणे | प्रतिनिधी**

जुलै 2021 मध्ये महापालिकेत समाविष्ट झालेल्या 23 गावांमध्ये मूलभूत पायाभूत सुविधा उभारण्यासाठी अखेर मोठा आर्थिक निर्णय घेण्याची तयारी प्रशासनाने सुरू केली आहे. पाणीपुरवठा आणि सांडपाणी व्यवस्थापनाच्या प्रलंबित प्रकल्पांना गती देण्यासाठी सुमारे दोन हजार कोटी रुपयांचे कर्ज जागतिक बँकेकडून उभारण्याचा प्रस्ताव पुढे आला असून, त्यासाठी प्राथमिक स्तरावर हालचाली सुरू झाल्या आहेत. जागतिक बँकेच्या अधिकाऱ्यांनी संबंधित गावांना भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केल्याने या प्रक्रियेला वेग आला आहे.

राज्य सरकारने शहरालगतची 23 गावे जुलै 2021 मध्ये पुणे महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला होता. या समावेशनामागे नियोजनबद्ध विकास, अनधिकृत बांधकामांवर




नियंत्रण, तसेच पाणी, सांडपाणी, रस्ते, पथदिवे, उद्याने, नाट्यगृहे आदी सुविधा उपलब्ध करून देण्याचा उद्देश होता. मात्र, समावेशनानंतर विकास आराखडा तयार करण्याचे आणि बांधकाम परवानग्यांचे अधिकार पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) कडे देण्यात आले.

पीएमआरडीएने तयार केलेला आराखडा वादग्रास्त ठरल्याने तो रद्द करण्यात आला असून, बांधकाम परवानग्यांचे अधिकार अलीकडेच महापालिकेकडे परत आले आहेत. पाच वर्षे उलटूनही अंतिम विकास आराखडा तयार नसल्याने ग्राामस्थांकडून नाराजी व्यक्त होत आहे. सुविधांचा अभाव असताना मिळकतकर वसूल केल्याची टीकाही केली जात आहे.

23 गावांपैकी 16 गावांच्या सांडपाणी व्यवस्थापनाच्या निविदा प्रक्रियेला गती मिळाली आहे. उर्वरित पूर्व भागातील वाघोली, लोहगाव, मांजरी, शेवाळवाडी, वडाचीवाडी, औताडवाडी, हंडेवाडी आणि पश्चिमेकडील बावधन या सात गावांसाठी स्वतंत्र सांडपाणी योजना आखण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी सुमारे 790 कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. यामध्ये चार सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणे, 378 किलोमीटर लांबीच्या सांडपाणी संकलन वाहिन्या टाकणे, 46 किलोमीटर मुख्य सांडपाणी वाहिनी तसेच 31 किलोमीटर अतिरिक्त वाहिन्या उभारणे यांचा समावेश आहे. या योजनेसाठी निधी जागतिक बँकेमार्फत मिळविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

समाविष्ट गावांमध्ये शाश्वत पाणीपुरवठा व्यवस्था उभारण्यासाठी जलवाहिन्या टाकणे, जलशुद्धीकरण केंद्र उभारणे, पाण्याच्या टाक्या बांधणे आणि घरगुती मीटर बसविणे अशी कामे हाती घेतली जाणार आहेत. यासाठी पाच ते सहा पॅकेज तयार करण्यात आली आहेत. लोहगाव-वाघोली भागासाठी 323 कोटी रुपयांची निविदा काढून कामास सुरुवात झाली आहे. उर्वरित गावांतील प्रकल्पांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी दोन हजार कोटी रुपयांचे कर्ज उभारण्याचा प्रस्ताव आहे.

> "समाविष्ट 23 गावांतील पाणीपुरवठा व सांडपाणी व्यवस्थापनासाठी जागतिक बँकेकडून दोन हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या निधीतून प्रकल्पांना वेग देता येईल.
>
> **- नवल किशोर राम, महापालिका आयुक्त**